## ः आरती गणपतीची ः

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची |
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची ।
कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ 1 ॥

जय देव जय देव जय मंगलमूर्ती । श्री मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रें मन कामना पुरती ॥ धृ.॥

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ॥
हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।
रूणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ 2 ॥ धृ.॥

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकष्टी पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ॥ 3 ॥ धृ.॥